# प्रेसनोट

दिनांक— ३०/०६/२०१८.

**महावितरण, मुंब्राउपविभाग, मुंब्रा येथील कार्यकारी अभियंत्यास लाच स्विकारताना अटक.**

दिनांक ३०/०६/२०१८ रोजी, महावितरण, मुंब्रा उपविभाग येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता, धनंजय वसंतराव भोजने, वय—५२ वर्षे, यांना तक्रारदार यांच्याकडून २०,०००/— रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीप्रमाणे

यातील तक्रारदार यांचे जादा आलेले लाईट बिल कमी करुन देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/— रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन अेसीबी, ठाणे यांनी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक धनंजय वसंतराव भोजने यांना तक्रारदार यांचेकडून २०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास श्री.दिपक बर्गे, पोलीस निरीक्षक, अेसीबी, ठाणे हे करत आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ९५९४९९६८६७० असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022—25427979**
३) ई—मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner